# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)


जा. क्र. मप्राशिप/सशिअ/२५टक्के प्रवेश/२०१७-१८/७३२३ दिनांक : 16 JUN 2017

**विषय: शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम १२ (१) (c) नुसार २५ टक्के प्रवेशाच्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत.**

शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२ (१) नुसार दुर्बल घटक व वंचित गटातील मुलांना राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये (अल्पसंख्यांक वगळून) २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतो. या प्रवेशाची शुल्क प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून शाळांना करण्यात येते. त्यानंतर भारत सरकार राज्य शासनाकडून शाळांना केलेल्या शुल्क प्रतिपूर्तीची तरतूद सर्व शिक्षा अभियानांतर्गत करते. त्याअनुषंगाने सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाची शुल्क प्रतिपूर्ती सन २०१६-१७ मध्ये भारत सरकारने मंजूर केली होती. सदरची मंजूर तरतूद राज्य शासनाकडे भरणा करून याबाबतचा जे.व्ही. आपणांस कळविण्यात आला आहे.

दिनांक ०९/०२/२०१७ रोजी झालेल्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तात भारत सरकारने सन २०१४-१५ मध्ये करण्यात आलेल्या एकूण शुल्क प्रतिपूर्तीची शिल्लक तरतूद सन २०१७-१८ करिता मंजूर केली आहे.

सदर मंजूर तरतूद या कार्यालयाकडून राज्य शासनाकडे भरणा करण्यात येईल. त्यामुळे आपल्या जिल्ह्यासाठी वरील विषयाच्या अनुषंगाने मंजूर तरतुदीचा विनियोग आपल्या स्तरावरून करण्यात येऊ नये. या उपक्रमांतर्गत खर्च झाल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी. जिल्ह्यांसाठी मंजूर आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. या तरतुदीचा राज्य शासनाकडे भरणा केल्यानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषदांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

या विषयाशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

(नंद कुमार भा.प्र.से.)
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व विभाग.
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व).

D:\P_Gaonkar\OLD\RTE\25% admission Guidelines 2017-18.docx

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया


Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com